कार्यालय
उपवनसंरक्षक, अकोला वन विभाग
कक्ष...... स्था.
28 FEB 2023
O.S./मु.ले. उवसं अकोला

## प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,महाराष्ट्र राज्य, नागपूर.
पहिला माळा, बी विंग,वनभवन,सिव्हील लाईन्स,नागपूर-४४०००१
दुरध्वनी क्र.(०७१२) २५५६९१६ ई मेल-apccfnodal@mahaforest.gov.in

कक्ष-१७/नोडल/अमरावती/आयडी क्र-१३१८९/3928/२०२२-२०२३

नागपूर-४४०००१, दिनांक: 16/०२/२०२३

आवक क्रमांक 1695
दिनांक 04/03/2023

विषय: - वनजमीन-अकोला

शेतीसाठी भुमिगत पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकण्यासाठी मौजे मोझरी खुर्द ता.बार्शिटाकळी जि.अकोला येथील श्री. मधुकर शेवला राटोड व इतर ९ यांचे शेतात सिंचना करीता पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकणेबाबतचे ०.३२ हे. वनजमिन वळतीकरणाचे प्रस्ताव.

संदर्भ: - शासन, महसूल व वन विभाग, पत्र क्र.एफएलडी-३०२३/प्र.क्र.३४/फ-१०, दि. १६/०२/२०२३.

विषयांकीत प्रकरणी संदर्भीय शासन पत्रान्वये उपस्थित करण्यात आलेल्या ६ मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय व आवश्यक दस्तऐवजांसह तीन प्रतीत सादर करावे.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

17/2/23

(नरेश झुरमुरे)

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी

प्रति,

वनसंरक्षक (प्रा),

अमरावती

प्रतिलिपी :- 1) उपवनसंरक्षक, अकोला वनविभाग अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

2) श्री मधूकर शेवला राटोड व इतर 9 रा.मोझरी खुर्द ता.बार्शिटाकळी जि.अकोला यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

P.T.O. -2-

क्र: सर्वे/वसंक/1980/ 8266 / 2022-23

अकोला, दिनांक- 23/03/2023

प्रतिलिपी :- प्रकल्प यंत्रणा श्री. मधुकर डोंबळा राठोड व इतर-१ रा. मोझरी ता. बार्शिटाकळी जि. अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. त्यांना सुचित करण्यात येते कि, शासन संदर्भीय पत्रातील मुद्दा क्र. १ ते ६ मुद्द्यांचा त्रुटीपूर्तता अहवाल आवश्यक दस्तऐवज व हमीपत्रासह तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

प्रतिलिपी :- सहाय्यक वनसंरक्षक (वने) अकोला यांना माहिती करिता अग्रेषित.

प्रतिलिपी :- वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) बार्शिटाकळी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

K.R.
Deputy Conservator of Forests
AKOLA Division, Akola

o/c

महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-३०२३/प्र.क्र.३४/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १६ फेब्रुवारी, २०२३

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वनजमीन -- अकोला
शेतीसाठी भुमिगत पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकण्यासाठी मौजे मोझरी खु., ता. बार्शी-टाकळी, जि. अकोला येथील ०.३२ हे. वनजमीन वळतेकरणाबाबत.

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/अमरावती/ID-१३१८९/२६५८/२०२२-२३, नागपूर, दिनांक ११.०१.२०२३

संदर्भाधीन दिनांक ११.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शेतीसाठी भुमिगत पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकण्यासाठी मौजे मोझरी खु., ता. बार्शी-टाकळी, जि. अकोला येथील ०.३२ हे. वनजमीन वळतेकरणाबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली नमूद मुद्यांची माहिती आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

(१) प्रस्तावामध्ये पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन साठी ३ अन्य पर्याय दिले आहेत. त्यापैकी "अ" येथील पर्याय वनक्षेत्राच्या दृष्टीने सर्वात उपयुक्त असल्याने प्रस्तावित करण्यात आला आहे. इतर "ब" आणि "क" पर्यायामध्ये जास्त वनक्षेत्राचा वापर होत असल्याने पर्याय नाकारले आहेत. परंतु, नकाशाचे अवलोकन केले असता, "अ" "ब" आणि "क" येथील पर्यायीसाठी अनुक्रमे ७६० मी., ७०१ मी. आणि ६२५ मी. (लांबी) एवढ्या क्षेत्राचा वापर होणार आहे. या उक्त ३ पर्यायापैकी "क" येथील पर्यायामध्ये कमी वनक्षेत्राचा वापर होत असल्याचे दिसून येते. असे असतानाही प्रस्तावित "अ" येथील ७६० मी. पर्यायापेक्षा जास्त अंतराचा म्हणजेच ८०० मी. अंतराचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी याबाबतचे स्पष्टीकरण सादर करावे.

(२) उक्त ३ पर्यायी व्यतिरिक्त अन्य एक पर्याय उपलब्ध असून, मौजे मोझरी, स.नं. ३५ येथील वनेत्तर क्षेत्रामधून पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकल्यास अंदाजे २००-२५० मी. (लांबी) एवढेच क्षेत्र लागू शकेल, त्याबाबत माहिती सादर करावी.

(३) भुमिगत इलेक्ट्रीक लाईन टाकण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेले ३.०० रुंदी चे क्षेत्र व्यवहार्य वाटत नाही. याबाबत अधिक माहिती सादर करावी. तसेच, पाईपलाईनच्या खंदकामध्ये इलेक्ट्रीक लाईन टाकता येणे शक्य आहे किंवा कसे, याबाबतही माहिती सादर करावी.

(४) पर्यायी वनीकरणासाठी केंद्रस्थ अधिकारी यांनी मौजे मोझरी, ता. बार्शी-टाकळी, मधील कंपा क्र. ३९७ येथील आणि उपवनसंरक्षक, यांनी मौजे सोनखास, ता. बार्शी-टाकळी, मधील कंपा क्र. ३९७ येथील वनक्षेत्र प्रस्तावित केले आहे. सदर २ क्षेत्रांपैकी नेमके कोणते क्षेत्र पर्यायी वनीकरण प्रस्तावित करावयाचे आहे, याबाबत माहिती सादर करावी. तसेच, सदर क्षेत्राचा ७/१२ देखील सादर करावा.

(५) प्रस्तावित केलेल्या मौजे मोझरी, मधील गट नं. २५ हा कंपा क्र. ३९७ चा भाग असल्याचे नमूद केले आहे. परंतु, नकाशा व KML File वरुन गट नं. २५ मधील क्षेत्र कंपा क्र. C29B चा भाग असल्याचे दिसते. सबब, याबाबत खात्री करण्यात यावी.

(६) प्रस्तावामध्ये वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे मोझरी. येथील गट नं. २३, २४ व २५ या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर अनुक्रमे ए क्लास, सरकार व सी क्लास अशा नोंदी आहेत. सबब, सदर वनजमिन आहे किंवा कसे ? याबाबत खातरजमा करणे आवश्यक आहे.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन